पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १६७**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **२८/०४/२०१५** वेळ – सकाळी **११.००** वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **२८/०४/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
४) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
५) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
६) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
७) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९) मा.काळे विमल रमेश
१०) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
११) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.गावडे-सह आयुक्त,मा.पाटील,मा.चव्हाण–सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे, मा.माने, मा.कडूसकर,मा.दंडवते,मा.दुरगुडे,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार, मा.दुधेकर,मा.निकम, मा.इंगळे,मा.तांबे,मा.कुलकर्णी,मा.जुंधारे,मा.केदारी,मा.शेख-कार्यकारी अभियंता,मा.बोदडे-प्र.अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्रमांक-३५) फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४ कृष्णानगर, से.नं.२० मधिल ३ अ व सेक्टर क्र.१८ शिवतेजनगर पी.सी.एन.टी.डी.ए. हस्तांतरीत मोकळी जागा क्र.२१ येथे सांस्कृतीक हॉल बांधणे तसेच से.नं.१८ सी.डी.सी मोकळी जागा १,२, व ३ विकसीत करणे या कामासाठी सल्लागार/वास्तुविशारद नेमणूक करणेबाबत...

विषय क्रमांक-३६) वाय.सी.एम.रुग्णालय या ठिकाणी वेस्ट वॉटर रिसायकलिंग पॅकेज प्लान्ट उभारणे व पुढील ५ वर्षे कालावधीकरिता चालन,देखभाल व दुरुस्ती करणेबाबत...

विषय क्रमांक-३७) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम राबविणेबाबत- मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३८) गरीब व गरजू मुलांना संगणक संच पुरविणेबाबत – मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-३९) थायलंड येथील पाचव्या योगा चॅम्पियनशिप स्पर्धेस उपस्थित रहाणेकामी अर्थसहाय्य करणेबाबत - मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४०) मनपाच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पी.टी. गणवेश वाटप करणेबाबत - मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४१) सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील कामांच्या वाढ-घटीस व वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत – मा.विनायक गायकवाड, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४२) सांगवी किवळे रस्ता Dedicated BRT Lane करणे कामाच्या सुधारित खर्चाबाबत...

विषय क्रमांक-४३) घरोघरचा कचरा गोळा करणेकामी उपलब्ध म.न.पा. वाहनावर खाजगीकरणाद्वारे उपलब्ध करणेत आलेल्या कामगारांना किमान वेतन दरानुसार वेतन फरक रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक-४४) जाहिरात रोटेशन धोरण सन २०१५-१६ बाबत

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

नेपाळ व भारतामध्ये झालेल्या भीषण भूकंपामध्ये मृत पडलेल्या नागरीकांना आजचे सभेत श्रद्धांजली वाहणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

--------

ठराव क्रमांक – ११३५२ विषय क्रमांक – १

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३क/कावि/२३२/१४ दि.१५/३/२०१४

विषय - प्रभाग क्र.३१ दिघी व इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार दिनांक २/६/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११३५३ विषय क्रमांक – २

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/२५१/२०१४ दि.२०/५/२०१४

विषय - अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेसाठी यंत्र सामग्री पुरविणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार दिनांक २/६/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११३५४ विषय क्रमांक – ३

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/४४/१५ दि.२०/२/२०१५

विषय - प्र.क्र५८ इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार दिनांक २/६/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३५५ विषय क्रमांक – ४

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/३२२/२०१५ दि.१६/०४/२०१५

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे करसंकलन विभागा करीता सन २०१५-१६ साठी आवश्यक प्रिप्रिंटेड मिळकतकर बिले छपाई साहित्य खरेदीकामी ई.नि.क्र.३१/२०१४-१५ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन चार दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.श्रीसाई श्रध्दा प्रिंटर्स, सातारा यांचे प्रिप्रिंटेड मिळकतकर बिले मनपाचे नमुन्याप्रमाणे A/4 साईज पेपर (210X294 MM), 80 GSM बल्लारपूर पेपरवर मल्टीकलरमध्ये दोन्ही बाजूस छपाई (बाब क्र.१) साहित्यासाठी र.रु.०.७४ प्रती नग लघुत्तम दर प्राप्त झाला आहे. तसेच मनपाचे करसंकलन विभागासाठी ९,५०,००० नग मिळकत कर बिले छपाई करणे आवश्यक आहेत. प्राप्त लघुत्तम दरानुसार प्रिप्रिंटेड मिळकतकर बिले पुरवठा करणेकामी एकूण र.रु.७,०३,०००/- खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १६.८५ % ने कमी असल्याने सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११३५६ विषय क्रमांक – ५
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/१३३/१५ दि.१६/४/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/क मुख्यालय/HO/२५/४५/२०१४-१५ अन्वये, मासुळकर कॉलनी मध्ये पेव्हींग ब्लॉक व इतर अनुषंगिक कामे करणे कामी M/S VYANKATESHWARA CONSTRUCTION (नि.र.रु.१३,०१,८१२/- (अक्षरी र.रू.तेरा लाख एक हजार आठशे बारा) पेक्षा ४०.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.८,१३,३०७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११३५७ विषय क्रमांक – ६
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.हिरानंद आसवाणी
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/१३०/१५ दि.१५/४/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/क मुख्यालय/HO/२५/२४/२०१४-१५ अन्वये, प्र.क्र.६२ दापोडी गणेशनगर परीसरात येथील पावसाळी गटरवर RCC स्लॅब टाकणेकामी M/S DRISHTI CONSTRUCTION (नि.र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख) पेक्षा -४२.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.९,१३,५००/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११३५८ विषय क्रमांक – ७
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/१३१/१४ दि.१६/४/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/क मुख्यालय/HO/२५/८/२०१४-१५ अन्वये, प्र.क्र.६२ फुगेवाडी मधील शितळादेवी चौकाचे सुशोभिकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी M/S DRISHTI CONSTRUCTION (नि.र.रु. १०,५०,०००/- (अक्षरी र.रू.दहा लाख पन्नास हजार) पेक्षा -४३.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.६,२८,४२५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित

केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३५९ विषय क्रमांक – ८

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/१३२/१५ दि.१६/४/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/क मुख्यालय/Prabhag/२५/४०/ २०१४-१५ अन्वये, प्र.क्र.४१ गांधीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती महोत्सव सन २०१३-१४ साठी मंडप व्यवस्था पुरविणेकामी M/S SHRIGANESH BALKISHNA PORE (नि.र.रु.९,१९,४४८/- (अक्षरी र.रू.नऊ लाख एकोणीस हजार चारशे आठ्ठेचाळीस) पेक्षा -३५.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.६,२७,५२३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६० विषय क्रमांक – ९

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/१३५/१४ दि.१६/४/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/क मुख्यालय/HO/२५/३८/२०१४-१५ अन्वये, प्र.क्र.३९, ४० इ. ठिकाणी विविध मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था व अनुषंगिक कामे करणेकामी M/S SHRIGANESH BALKISHNA PORE (नि.र.रु. ८,४०,१०८/- (अक्षरी र.रू.आठ लाख चाळीस हजार एकशे आठ) पेक्षा -३४.३५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.५,७९,१०७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६१ विषय क्रमांक – १०

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/१७६/२०१५ दि.१६/४/२०१५

विषय - ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात औष्णीक धुरीकरण करणेकरीता रिक्षा टेम्पो भाड्याने घेणेबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११३६२ विषय क्रमांक – ११
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.हिरानंद आसवाणी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/४/कावि/९३१/२०१५ दि.१५/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

राज्य शासनाचे आदेशानुसार दरवर्षीप्रमाणे सन २०१४-१५ मध्ये पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २२ फेब्रुवारी २०१५ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेचा व्यापक प्रचार व प्रसिध्दी करणेकामी वैद्यकिय विभागाकडील 'एन.यु.एच.एम.' या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.४८,०००/- (अक्षरी र.रू.आठ्ठेचाळीस हजार) अगाऊ काढुन खर्च करणेत आलेले असल्याने सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६३ विषय क्रमांक – १२
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/६/कावि/१६९/२०१५ दि.१७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने महात्मा बसवेश्वर जयंती दि.२१ एप्रिल २०१५ रोजी असल्याने सदर जयंतीचे औचित्य साधून दि.१९/४/२०१५ रोजी व्याख्यान, रक्तदान शिबीर व विविध कार्यक्रमांचे आयोजन इंद्रायणी मंगल कार्यालय, भोसरी या ठिकाणी करण्यात आलेले आहे. याकामी व्याख्यात्यांचे मानधन, कार्यालय भाडे, चहापान भोजन व्यवस्था, रांगोळी व फ्लेक्स इ. साठी थेट पध्दतीने अंदाजे र.रु. ४६,०००/- (अक्षरी र.रु.शेहेचाळीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याने या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११३६४ विषय क्रमांक – १३
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/१३४/१५ दि.१६/४/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/ब मुख्यालय/Prabhag/ २५/१७/२०१४-१५ अन्वये, प्र.क्र.३९ संततुकारामनगर परिसरामध्ये ठिकठिकाणी रस्ते, व मनपा इमारतीची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची व विकासाची कामे करणे कामी M/S DRISHTI CONSTRUCTION (नि.र.रु.९,०९,६४३/- (अक्षरी र.रू.नऊ लाख नऊ हजार सहाशे त्रेचाळीस) पेक्षा -३७.००% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.६,०१,७२९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा वसुल करणे बंधनकारक राहिल या

अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६५ विषय क्रमांक – १४
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/स्था/कावि/४०५/१५ दि.१७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आरक्षण क्र.GP-१३२ येथे बस टर्मिनन्स क्षेत्रीय कार्यालय व नाट्यगृह बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामाचे नकाशे एम.आय.डी.सी. कार्यालयात सादर केलेले आहेत. एम.आय.डी.सी. कार्यालया कडून सदर नकाशे बांधकाम परवानगीचे अंतिम टप्या मध्ये आहेत. सदर कामासाठी अग्निशामक विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे यासाठी अग्निशामक विभागाने त्यांची फी भरणे कामी चलन पाठविलेले आहे. सदर फी भरणा एकूण र.रू.२९,८६,०३८/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख शहाऐंशी हजार अडतीस फक्त) इतका आहे. यासाठी महानगरपालिकेमार्फत Demand draft तयार करणे आवश्यक असल्याने सदर फी भरणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६६ विषय क्रमांक – १५
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – लेखा
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/२८५/२०१५ दि.१८/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.१२० कोटी तरतूद करणेत आली असून त्यामधून संचलन तूटीपोटी प्रतीमाह र.रु.५.०० कोटी (अक्षरी रक्कम रुपये पाच कोटी फक्त) व सवलतीचे पासेस पोटी र.रू.१.५० कोटी (अक्षरी र.रू.एक कोटी पन्नास लाख फक्त) असे एकूण प्रतीमहा र.रु.६.५० कोटी (अक्षरी रक्कम रुपये सहा कोटी पन्नास लाख फक्त) माहे एप्रिल २०१५ ते फेब्रुवारी २०१६ अखेर ११ महिने प्रतीमहा अग्रीम स्वरुपात अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६७ विषय क्रमांक – १६
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग –मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/२९६/२०१५ दि.२०/४/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे इ क्षेत्रिय कार्यालयाकरिता आवश्यक फर्निचर खरेदीकामी कोटेशन नोटीस क्र. ३७/२०१४-१५ अन्वये ऑनलाईन प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदेमधिल १)मे.सिध्दिविनायक इंडस्ट्रिज यांचे सोफा सेट करिता र.रु.५३,५५४/- २) मे.श्री साई उद्योग यांनी पी.व्ही.सी. कुशन चेअर करिता

र.रु.५४,१२५/- यांचेकडील प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास एकुण र.रु.१,०७,६७९/- (अक्षरी र.रू. एक लाख सात हजार सहाशे एकोणऐंशी) चे खर्चास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६८ विषय क्रमांक – १७

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१४०/१५ दि.२०/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.०१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.३३ अन्वये प्रभाग क्र.२५ मधील आंनदनगर झोपडपट्टीत रस्त्याचे डांबरीकरण करणे व इतर अनुषांगिक कामे करणेकामी मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रु १४,९३,०००/- (अक्षरी र.रु.चौदा लाख त्र्यान्नव हजार फक्त) पेक्षा २.९० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१४,४९,७०३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा /वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३६९ विषय क्रमांक – १८

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/३१५/१५ दि.२०/४/२०१५

विषय – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील हेल्थकार्ड मॅनेजमेंट सिस्टिमच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीबाबत...

विषय क्रमांक १८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७० विषय क्रमांक – १९

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – करसंकलन

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/३/कावि/२५०/२०१५ दि.२०/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

खालील पुरवठाधारक यांनी मिळकतकर वसुली व स्वाईन फ्लुसाठी जनजागृती मोहिम राबविणेकामी दि. १६/३/२०१५ ते ३१/३/२०१५ या कालावधीमध्ये वाहने व स्पिकर सेट पुरविलेले आहेत. त्याच्या एकुण भाडयाच्या बिलाची र.रु. ९९२००/- ची मागणी केलेली आहे. सदरचा खर्च करसंकलन विभागाकडील वाहन भाडयाने घेणे या लेखाशिर्षामधुन खर्ची टाकणेस व सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

| अ क्रं | वाहन/स्पीकर पुरवठा धारकाचे नाव | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | कालावधी | एकुण दिवस | मान्य दर(प्रति दिन) | एकुण देय र.रु. | आयकर २% | निव्वळ देय र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. ताराकिशोर विश्वनाथ शेळके | ॲटोरिक्षा स्पिकरसेट सह | MH12-AV-326 | १६/३/१५ ते ३१/३/१५ | १६ | २००० | ३२००० | ६४० | ३१३६० |
| २ | श्री.राजेंद्र गणपतराव जगताप | ॲटोरिक्षा स्पिकरसेटसह | MH14-CV-1005 | १६/३/१५ ते ३१/३/१५ | १६ | २००० | ३२००० | ६४० | ३१३६० |
| ३ | श्री. अमोल कालीदास बारंगुळे | तवेरा | MH13-AX-1112 | १६/३/१५ ते ३१/३/१५ | १६ | १२०० | १९२०० | ३८४ | १८८१६ |
| ४ | ACE INFO TECH | स्पिकर सेट | -- | १६/३/१५ ते ३१/३/१५ | १६ | १००० | १६००० | ३२० | १५६८० |
| | एकुण रक्कम रुपये | | | | | | ९९२०० | १९८४ | ९७२१६ |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७१ विषय क्रमांक – २०

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/कावि/१४१/२०१५ दि.२०/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.०१/८८-२०१४-१५ मधील अ.क्र.१८ अन्वये प्रभाग क्र.०६ मधील संजय गांधी नगर झोपडपट्‌टी मधील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे इतर अनुषांगिक कामे करणेकामी मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रु.१४,९३,९००/- (अक्षरी र.रु.चौदा लाख त्र्याण्णव हजार नऊशे फक्त) पेक्षा २.९० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१४,५०,५७७/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७२ विषय क्रमांक – २१

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१२२/२०१५ दि.२१/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या गायनॅक वार्ड-३ मधील M/s.Medela कंपनीचा नादुरुस्त Breast Pump – Sr. No. 1281259 दुरुस्त करणे व

दुरुस्तीकामी आवश्यक स्पेअर पार्टसचा पुरवठा करणेकामी कोटेशन नोटीस क्र.२७/२०१४-१५ अन्वये मागविणेत आलेल्या दरपत्रकांमध्ये संबंधित उत्पादित कंपनीचे अधिकृत सर्व्हिस प्रोव्हायडर M/s.Seward System INC, मुंबई यांचे दरपत्रक एकूण र.रु.८१,०००/- (अक्षरी र.रु.ऎक्याऎंशी हजार फक्त) (सर्व करांसह) लघुत्तम प्राप्त झाले असुन स्विकृत करणेत आले आहे. तरी गायनॅक वार्ड-३ मधील M/s.Medela कंपनीचा नादुरुस्त Breast Pump – Sr.No.1281259 M/s.Seward System INC, मुंबई यांचेकडून दुरुस्त करणे व दुरुस्तीकामी आवश्यक स्पेअर पार्टस खरेदी करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.८१,०००/- (अक्षरी र.रु.ऎक्याऎंशी हजार फक्त) (सर्व करांसह) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७३ विषय क्रमांक – २२

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१२३/२०१५ दि.२१/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसीस विभागातील गॅंब्रो कंपनीची डायलिसीस मशीन Sr.No.७५८९ ला Variable flow motor हा पार्ट तातडीक स्वरुपात बसविणेत आला असुन सदरची मशीन आज रोजी सुस्थितीत चालु असुन डायलिसीस विभागातील गॅम्ब्रो कंपनीचे डायलिसीस मशीन Sr.No.७५८९ ला बसविलेला पार्ट Variable flow motor एकूण र.रु.२६,९८५/- (सर्व करांसह) चे बील संबंधित मशीनचे अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक मे.मनाली एंटरप्रायजेस, पिंपरी यांना अदा करणेस व सदर पार्ट खरेदीकामी होणारा खर्च एकूण र.रु.२६,९८५/- (अक्षरी र.रू.सव्वीस हजार नऊशे पंच्याऐंशी) (सर्व करांसह) ला कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७४ विषय क्रमांक – २३

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८८/२०१५ दि.२१/४/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र. २/८७/२०१४-१५ मधील अ.क्र.९ अन्वये अ प्रभागांतर्गत जलक्षेत्र क्र.बी/१, २ व ४ मध्ये विद्युत पंप व अनाधिकृत नळ कनेक्शन तोडणेकामी मजुर कर्मचारीसह वाहन पुरविणेकामी मे.दीप कन्स्ट्रक्शन (निविदा रक्कम रू.१४,०१,३३६/- (अक्षरी र.रू. चौदा लाख एक हजार तीनशे छत्तीस फक्त) पेक्षा ४.००% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१४,१२,५४६/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७५ | विषय क्रमांक – २४

दिनांक – २८/०४/२०१५ | विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे | अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८७/२०१५ दि.२१/४/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१३/१९/२०१४-१५ मधील अ.क्र.२ अन्वये अ प्रभागा अंतर्गत सन २०१४-१५ साठी रावेत येथील अशुध्द जलउपसा केन्द्राच्या परिसरात पाणीपुरवठा विषयक व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी मे.युनिक ट्रेडर्स (निविदा रक्कम रू.२२,८३,७४९/- (अक्षरी र.रू.बावीस लाख त्र्याऐंशी हजार सातशे एकोणपण्णास फक्त) पेक्षा २२.१०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१८,६७,९९२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७६ | विषय क्रमांक – २५

दिनांक – २८/०४/२०१५ | विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.संपत पवार | अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८६/२०१५ दि.२१/४/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/३५/२०१४-१५ मधील अ.क्र.३२ अन्वये जलक्षेत्र क्र.ड/९ पिंपळे सौदागर परीसरात टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी मे.साई एंटरप्रायझेस (निविदा रक्कम रू.१०,५०,५५०/- (अक्षरी र.रू.दहा लाख पन्नास हजार पाचशे पन्नास फक्त) पेक्षा ३.००% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१०,६९,९८५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७७ | विषय क्रमांक – २६

दिनांक – २८/०४/२०१५ | विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.रमा ओव्हाळ | अनुमोदक–मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षे/९/कावि/१०३/१५ दि.२१/४/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/५९-२०१४-१५ अन्वये प्र.क्र. ४२ भाटनगर मधील परिसरातील पाथवेची किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.पांडुरंग इंटरप्रायजेस (नि.र.रु.९,२९,३०१/- (अक्षरी र.रु.नऊ लाख एकोणतीस हजार तीनशे एक फक्त) पेक्षा -३९.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु ५,८५,५५७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व

निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७८ विषय क्रमांक – २७

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८५/२०१५ दि.२१/४/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/३५/२०१४-१५ मधील अ.क्र.१८ अन्वये जलक्षेत्र क्र. ड/९ पिंपळे सौदागर परीसरात पाणी पुरवठा विषयक किरकोळ दुरूस्तीची कामे करणेकामी मे.अनिकेत एंटरप्रायझेस (निविदा रक्कम रू. १०,५०,००३/- (अक्षरी र.रू.दहा लाख पन्नास हजार तीन फक्त) पेक्षा ४१.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६,३९,५६२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३७९ विषय क्रमांक – २८

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/८४/२०१५ दि.२१/४/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/३५/२०१४-१५ मधील अ.क्र.१० अन्वये, जलक्षेत्र क्र.ड/१२, पिंपळे गुरव मध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे.अनिकेत एंटरप्रायझेस (निविदा रक्कम रू.१०,४९,१५८/- (अक्षरी र.रू.दहा लाख एकोणपन्नास हजार एकशे अट्ठावन्न फक्त) पेक्षा ४१.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६,३९,०४७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३८० विषय क्रमांक – २९
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/४/कावि/४४/२०१५ दि.२२/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुख व अभियंते यांस ३-जी नेट सुविधा / डोंगल पुरविणेकामी मे.आयडीया सेल्युलर लि. (नि.र.रू.९०.००,०००/- (अक्षरी र.रू. नव्वद लाख) ४३०/- प्रती नग) (अंदाजे ५०० कनेक्शनकरिता) या ठेकेदाराकडून काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३८१ विषय क्रमांक – ३०
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/३३२/२०१५ दि.२६/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रीडा समिती सभा दिनांक ६/०४/२०१५ ठराव क्र.८९ अन्वये, मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १२०६, दि.२०/१०/२०११ व आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे खेळाडू दत्तक योजना २०१२-१३ मधील ८३ पैकी ६२ खेळाडूंना सन २०१४-१५ मध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे लाभ देणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.६५,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेस व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३८२ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.हिरानंद आसवाणी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५६/२०१५ दि.२२/४/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मार्च, २०१५ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३८३ विषय क्रमांक – ३२
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५७/२०१५ दि.२२/४/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०.३.२०१५ ते दि.५.४.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/५७/२०१५ दि.२२.४.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११३८४ विषय क्रमांक – ३३
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षक
सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५८/२०१५ दि.२२/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.६.४.२०१५ ते दि.१२.४.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/५८/२०१५ दि.२२.४.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३८५ विषय क्रमांक – ३४
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/२३१/२०१५ दि.२३/४/२०१५

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी करीता व्यायामशाळा दुरुस्तीकामी आवश्यक रॉ मटेरियल खरेदीकामी कोटेशन नोटीस क्र.४६/२०१४-१५ अन्वये, ऑनलाईन कोटेशन दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.भारती इंटरप्रायजेस यांचे एकूण २ बाबींचे दर र.रु.२२,९३२/- (अक्षरी र.रू. बावीस हजार नऊशे बत्तीस) चे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. मे.भारती एंटरप्रायजेस यांचेकडून करारनामा करुन घेणेत आला असून त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर संविदेची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>

ठराव क्रमांक –११३८६ विषय क्रमांक – ३५
दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/स्था/कावि/४७२/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.४ कृष्णानगर, से.नं.२० मधिल ३ अ व सेक्टर क्र.१८ शिवतेजनगर पी.सी.एन.टी.डी.ए. हस्तांतरीत मोकळी जागा क्र.२१ येथे सांस्कृतीक हॉल बांधणे तसेच से.नं.१८ सी डी सी मोकळी जागा १,२ व ३ विकसीत करणे या जागेवर पिं.चिं. नवनगर विकास प्राधिकरणाची मंजूरी घेऊन सांस्कृतिक हॉल बांधणे या कामासाठी महानगरपालिका पॅनल वरील मे.सचिन आपटे ॲण्ड असोसिएटस् चिंचवड पुणे यांची वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणे व निविदा पश्चात सदर कामांवर दैनंदिन देखभाल, नियंत्रण ठेवणेसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणे सुयोग्य होईल त्यानुसार अंदाजपत्रकिय रक्कमेच्या २% सर्वकरासह

आर्किटेक्ट म्हणून आणि पोस्ट टेंडर ऍक्टीव्हीटी मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून प्रत्यक्ष होणा-या कामांच्या १.३५% सर्वकरासह अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३८७ विषय क्रमांक – ३६

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/१७८/२०१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV/०७/०१/२०१४-१५ मधील वाय.सी.एम. रुग्णालय याठिकाणी वेस्ट वॉटर रिसायकलिंग पॅकेज प्लान्ट उभारणे व पुढील ५ वर्षे कालावधीकरिता देखभाल व दुरुस्ती करणे या कामासाठी मे.वॉटर ट्रीटमेंट इक्विपमेंटस् यांचेकडुन ररु.१,८१,६८,७५०/- (Designing,providing erecting commissioning and running/performing package plant for waste water treatment in YCM Hospital) व र.रु.१,००,०००/- (O&M) प्रतिमहा या दराने ५ वर्षे कालावधीकरिता करणेबाबत त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३८८ विषय क्रमांक – ३७

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला व मुले /मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यातील "महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" ही एक योजना असुन गेल्या दोन वर्षांपासून ती मनपा स्तरावर राबविण्यात येते.

सदरची योजना गेल्या दोन वर्षांपासुन मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने, पिंपरी चिंचवड महापालिकेत चांगल्या प्रकारे राबविली आहे. आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठया प्रमाणावरील कामकाज करणेसाठी आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेषकरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वस्तीपातळीवरील प्रशिक्षण देण्याचा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला भरपुर अनुभव आहे. त्यानुसार तातडीने योजना सुरु होणेकामी, संस्था निवडीसाठी लागणारा प्रदिर्घ कालावधीचा विचार करता मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत थेट पद्धतीने मनपा स्तरावर संस्थेमार्फत सादर दर, विषय, शैक्षणिक अर्हता, प्रशिक्षण कालावधी, प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम इत्यादीची खातरजमा करुन दि.३१/०३/२०१६ अखेरपर्यंतच्या कालावधी पर्यंतचे प्रशिक्षणाचे काम मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत देणेस मान्यता देणेत येत आहे व सदरची योजना ही मनपा स्तरावर, मनपाच्या यापुर्वीची मान्यता (धोरण)/ कार्यपद्धतीनुसार राबविणेत यावी. यामध्ये आवश्यकतेनुसार बदल/दुरूस्ती करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो., यांना देणेत येत आहे.

प्रशिक्षणास इच्छुक महिला ही, प्रशिक्षण विषयानुसारचा अभ्यासक्रम/प्रशिक्षणात शिकविण्यात येणा-या बाबी, गरज/आवश्यकता, व्यवसाय करणेसाठी त्याची उपयुक्तता इत्यादीचा तसेच करावयाचा कोर्स हा, कोर्ससाठी असणा-या त्या त्या कालावधीनुसार करणे आपल्याला जमेल का? याचा विचार करुनच एकुण प्रशिक्षण शुल्काच्या १०% इतकी होणारी रक्कम भरुन प्रशिक्षणात सहभागी होत असते.

मात्र प्रशिक्षणास विषयानुरुप शैक्षणिक अर्हता ठेवल्यास त्या त्या विषयनिहाय प्रशिक्षणासाठीची विशिष्ट असी शैक्षणिक अर्हता नसल्यास अथवा थोडीफार कमी असल्यास ते प्रशिक्षण घेण्याची क्षमता / इच्छा असुन देखील विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हते अभावी त्या महिलेला प्रशिक्षणात सहभागी होता येत नाही. त्यामुळे इच्छुक महिला प्रशिक्षणापासून वंचित राहते. महिलांच्या सबलीकरणाच्या/सक्षमीकरणाच्या उद्देशाला सदरची बाब बाधक आहे. म्हणून शैक्षणिक अर्हतेच्या पुराव्याची अट कुठल्याही कोर्सेसला न लावता, सर्व कोर्सेसला साक्षर अशी अट लावुन मान्यता देण्यात यावी. म्हणजे कोर्स करायची इच्छा असलेली कुठलीही साक्षर महिला प्रशिक्षणापासुन वंचित राहणार नाही.

सदरचे प्रशिक्षण हे संस्थेमार्फत सादर अभ्यासक्रमानुसार व प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये नमुद केलेनुसार प्रशिक्षण विषय, शैक्षणिक अर्हता, कालावधी (दिवस/तास) प्रशिक्षण शुल्कानुसार मागील वर्षीच्या कार्यपद्धती व मनपाच्या अटी व शर्तीनुसार पात्र होणा-या महिला/मुलींना अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांच्यामार्फत थेट पद्धतीने देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत व्यवसाय प्रशिक्षण योजनेअंतर्गत, प्रशिक्षणात भाग घेतलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रशिक्षणास मान्यता देणेत येत आहे. चालु वर्षी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणात भाग घेणा-या महिलांना एका पेक्षा अधिक प्रकारच्या विषयांचे प्रशिक्षण घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. त्यात महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या उपलेखाशिर्षासह एकुण ४० उपलेखाशिर्षांचा समावेश आहे. तरी महिलांसाठी ज्ञानकौशल्य वाढ कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर नागरवस्ती विकास योजना विभागाने उर्वरीत ३९ उपलेखाशिर्षांतर्गत केलेल्या तरतुदीमधुन सदर योजनेसाठी लाभार्थ्यांच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाच्या खर्चाकामी आवश्यकतेनुसार रक्कमा वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार सदर योजना मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत दि.३१/०३/२०१६ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –११३८९ विषय क्रमांक – ३८

दिनांक – २८/०४/२०१५

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.२७,३७ मधील महात्मा फुले नगर या ठिकाणी फोर्ड फाऊंडेशन यांच्या वतीने या वॉर्डात वाय फाय नेट सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. त्याचा लाभ घेऊन गरीब व गरजू मुलांना संगणक शिकता यावे यासाठी तेथे प्रत्येक वॉर्डात ३० संगणक व ३ प्रिंटर उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३९० विषय क्रमांक – ३९

दिनांक – २८/०४/२०१५

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

कु.नुपूर लक्ष्मण मोरे हिला थायलंड येथील पाचव्या योगा चॅम्पियनशीप स्पर्धेस उपस्थित रहाणेकामी र.रु.७०,०००/- अर्थसहाय्य मंजूर करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस

मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३९१ विषय क्रमांक – ४०

दिनांक – २८/०४/२०१५

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या वतीने माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंतर्गत एकूण १८ विद्यालयांतून एकूण विद्यार्थी शिक्षण घेतात. सदर विद्यार्थी इयत्ता ५ वी ते १० वी चे असून या विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ या वर्षात प्रत्येकी दोन शालेय गणवेश व एक पी.टी गणवेश श्री महालक्ष्मी ड्रेसेस ऍण्ड टेलरिंग फर्म या संस्थेने पुरविले आहेत. सन २०१५-१६ या वर्षात विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पी.टी गणवेश शाळा सुरु होतानाच वाटप करणेकामी कालमर्यादा विचारात घेऊन २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-६ परिच्छेद ८.३ नुसार पुर्नप्रत्ययी आदेशानुसार श्री महालक्ष्मी ड्रेसेस ऍण्ड टेलरिंग फर्म या संस्थेकडूनच सन २०१४-१५ च्या दरात कुठलीही दरवाढ न देता खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. २,२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी वीस लाख फक्त) च्या खर्चास व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. त्याप्रमाणे मे.महालक्ष्मी ड्रेसेस ऍण्ड टेलरींग फर्म यांना गणवेष व पी.टी गणवेष पुरवठा आदेश देण्याची खात्याने कार्यवाही करावी. त्यामुळे शाळा सुरु होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ मिळेल त्या अनुषंगाने सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३९२ विषय क्रमांक – ४१

दिनांक – २८/०४/२०१५

सुचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.विनायक गायकवाड, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केलेल्या विकास कामांना मा.महापालिका सभा ठराव क्र.६६३, दि.६/४/२०१५ अन्वये सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळाली असलेने प्रस्तावातील स्तंभ क्र.९ मध्ये नमुद असलेल्या रक्कमेपर्यंतच्या मंजुर निविदा दराप्रमाणे येणा-या वाढीव खर्चास व तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३९३ विषय क्रमांक – ४२

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – स्थापत्य बीआरटीएस

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/३३१/१५ दि.७/३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

सांगवी किवळे रस्त्यावर राजीव गांधी पूल औंध ते रावेत या बी.आर.टी. रस्त्यावर Dedicated Lane करणे कामाची र.रु.६,२७,१८,७६५/- ची निविदा काढण्यात आलेली आहे. सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.५८४७ दि.२२/५/२००६ अन्वये र.रु.३८३८.४० कोटीस एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या कामाचा निविदा दर ११.०७% कमी दराचा विचार करता एकूण खर्च

र.रु.५,८५,६४,५८८/- इतक्या खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.३६०० दि.२६/६/२०१३ नुसार मान्यता आहे.

खालील बाबींमुळे सदर कामाचे खर्चात वाढ होणार आहे.

४. रक्षक चौकापासून ते औंध हॉस्पिटल पर्यंत रस्त्याच्या राहिलेल्या ठिकाणी Dedicated Lane करणे कामास र.रु.२९,३८,०००/- एवढा खर्च होणार आहे.

५. सांगवी किवळे बी.आर.टी. रस्त्यावर आवश्यक झेब्रा पट्टे मारणे तसेच बी.आर.टी वाहतुकीच्या सोईच्या दृष्टीने आवश्यक पट्टे थर्मोप्लास्ट पेंटने रंगविणे कामास र.रु.१०,००,२०५/- इतका खर्च होणार आहे.

६. बी.आर.टी. बस स्टेशन जवळ पादचारी मार्गावर स्टेनलेस स्टील बोलार्ड बसविणे या कामास र.रु.९,८६,७७६/- इतका खर्च होणार आहे.

वरील संभाव्य खर्चाचा विचार करता या कामावर एकूण र.रु.६,२४,८०,३३९/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

या कामावर होणार संभाव्य खर्च र.रु.६,२४,८०,३३९/- इतका होत आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र. ३६०० दि. २६/६/२०१३ नुसार र.रु.५,८५,६४,५८८/- खर्चास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी सांगवी किवळे रस्ता Dedicated BRT Lane करणे काम करण्यास येणा-या र.रु.६,२४,८०,३३९/- चे सुधारित खर्चास (र.रु.३९,१५,७५१/- चे वाढीव खर्चास) तसेच डांबर, सिमेंट, स्टील या तिनही मटेरीयलच्या निर्धारित केलेल्या बेसिक कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३९४ विषय क्रमांक – ४३

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.हिरानंद आसवाणी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का/कावि/१५४/१५ दि.२८/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ व ड प्रभाग (जुना) मध्ये घरोघरचा कचरा गोळा करणेकामी उपलब्ध म.न.पा. मालकीचे Tata Ace वाहनांवर र.रु.६०००/- एकत्रित मासिक मानधनावर कामगार पुरविणेकामी निविदा (४/२०१२-१३) मागविणेत आल्या होत्या. सदर निविदेनुसार अ-प्रभाग (जुना) करीता पात्र निविदाधारक १) श्री. संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, दापोडी २) रमाबाई स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, वाकड यांची र.रु.६०००/- प्रति कामगार मासिक मानधनावर ५५ वाहनांकरीता ११० कामगार पुरविणेकामी ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली आहे. तसेच ड-प्रभाग (जुना) करीता पात्र निविदाधारक १) श्री. महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, संत तुकाराम नगर यांची र.रु.५५८४.८० (मंजूर निविदा ६.९२ टक्के कमी दराची) प्रति कामगार मासिक मानधनावर ७० वाहनांकरीता १४० कामगार पुरविणेकामी ठेकेदार म्हणून नेमणुक करणेत आली आहे. (प्रतिदिनी एकूण २५० कामगार) सदर निविदेनुसार दिनांक १/११/२०१२ पासून प्रत्यक्ष कामकाज सुरु आहे. या कामगारांना किमान वेतन दराने वेतन अदा करणेत येत नसलेने मे.कागद,काच,पत्रा कष्टकरी पंचायत यांना मा.कामगार उपायुक्त कार्यालय, पुणे यांचेकडे तक्रार दाखल केली आहे. मा.कामगार उपायुक्त, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. काउका/अंमल/३०१९ दिनांक ५/२/२०१५ नुसार सफाई कामगारांना शासनाने जाहीर केलेल्या दरानुसार किमान वेतन दरानुसार कंत्राटदार जर वेतन देत नसतील तर कंत्राटी कामगार

अधिनियम १९७० नुसार त्याची जबाबदारी मुख्य मालक म्हणून महापालिकेची असल्याने फरकाची रक्कम महापालिकेने अदा करणेबाबत कळविले आहे. तसेच किमान वेतन दरानुसार कंत्राटी कामगारांना वेतन न दिल्यास फरकाच्या रकमेच्या १० पट दंडाची तरतुद किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या कलम २० (३) (१) मध्ये आहे असेही कळविले आहे. त्यानुसार म.न.पा. चे अ व ड प्रभाग (जुना) मध्ये घरोघरचा कचरा गोळा करणेकामी उपलब्ध म.न.पा. मालकीचे Tata Ace वाहनांवर ठेकेदारांमार्फत उपलब्ध करणेत आलेल्या कामगारांना किमान वेतन दराने देय असणारी फरकाची रक्कम अदा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम संबंधित कामगारांना अदा करणे व याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास अ-प्रभाग (जुना) र.रु.३७,१७,०००/- व ड-प्रभाग (जुना) र.रु.६४,१७,०००/- एकूण र.रु.१,०१,३४,०००/- इतक्या अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –११३९५ विषय क्रमांक – ४४

दिनांक – २८/०४/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/१७६/१५ दि.२७/४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शासन मान्य यादीवर असणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य दराने जाहिराती देणेत येतात. यामध्ये अ,ब व क वर्ग वृत्तपत्रांचा समावेश आहे. शासनमान्य दराने जाहिरात प्रसिद्ध करणा-या प्रस्तावात नमूद केलेल्या वृत्तपत्रांना मनपाच्या यादीवर घेण्यास व शासनमान्य दराने जाहिराती वितरीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५२/२०१५
दिनांक - २८/०४/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.